## महत्त्वाचे

### ट्रान्सपोर्ट ऑफिसमध्ये चोरी व तोडफोड

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – जे. जे. गल्ली, मंगलगेट येथील मिरा ट्रान्सपोर्टच्या कार्यालयात झालेल्या चोरी आणि तोडफोड प्रकरणी इसरार उर्फ टकलु मुक्तार शेख (रा. कोठला झोपडपट्टी, अहिल्यानगर) याच्याविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुरूवारी (७ ऑगस्ट) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्फराज इनायत बेग (वय ५०, रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, ते ५ जुलै रोजी रात्री नेहमीप्रमाणे मिरा ट्रान्सपोर्ट ऑफिस लॉक करून घरी गेले होते. ७ जुलै रोजी मध्यरात्री मोहरमची मिरवणूक संपल्यानंतर दुचाकी घेण्यासाठी गेल्यावर त्यांनी इसरार शेख याला ड्रिल मशीनच्या सहाय्याने ऑफिसचा दरवाजा आणि भिंत तोडताना पाहिले.त्याने दुकानातील लाईट्स, टेबल व इतर साहित्याची तोडफोड केली. तसेच ऑफिसचा दरवाजा फोडून छतावरील पत्रे काढले, लाकडी टेबल व त्यावर ठेवलेली तीन कामाची रजिस्टर व रोजमेळ पुस्तके तसेच टेबलच्या ड्रॉवरमधील रोख रक्कम १० हजार रूपये चोरून नेले असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

### कत्तलीसाठी ठेवलेल्या जनावरांची सुटका

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – सहा गोवंशीय जनावरांना अमानुष वागणूक देत कत्तलीच्या उद्देशाने डावून ठेवल्याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी कारवाई करत एक जणाविरूध्द गुन्हा नोंदविला आहे. मोरेवस्ती, ब्रम्हतळे, आलमगीर (ता. अहिल्यानगर) येथे गुरूवारी (७ ऑगस्ट) दुपारी १२:१५ वाजता ही कारवाई करण्यात आली आहे. संतोष विठ्ठल जाधव (रा. मोरे वस्ती, ब्रम्हतळे, आलमगीर) असे गुन्हा दाखल झालेल्या संशयिताचे नाव असून या प्रकरणी पोलीस अंमलदार प्रमोद लहारे यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष जाधव याने लहान-मोठी अशी एकूण सहा जर्सी वासरे चारापाणी न देता निर्दयतेने ठेवल्याचे आढळले. तसेच ही जनावरे कत्तलीसाठी नेण्याच्या तयारीत असल्याचे निर्दशनास आले. पोलिसांची चाहूल लागताच संशयित आरोपी घटनास्थळावरून पसार झाला असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

### हॉटेलमध्ये वीज चोरी; गुन्हा दाखल

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – ब्राम्हण गल्ली, बारातोटी कारंजा, माळीवाडा येथील हॉटेल अभिषेक मध्ये गेल्या १२ महिन्यांपासून वीज मीटरमध्ये फेरफार करून एकूण ५ हजार २७९ युनिट वीज चोरी केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता राजेंद्र हिरालाल राजपूत (वय ५५, रा. ठाकरेनगर, सिडको, छत्रपती संभाजीनगर) यांच्या फिर्यादीवरून चैताली बाळासाहेब बोराटे (रा. ब्राम्हण गल्ली, अहिल्यानगर) यांच्याविरूध्द भारतीय वीज अधिनियम २००३ कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चैताली बोराटे यांनी त्यांच्या नावावरील वीज मीटरमध्ये फेरफार करून वीज वापर लपवला. गेल्या १२ महिन्यांमध्ये ५ हजार २७९ युनिटची चोरी करून सुमारे १ लाख २३ हजार १८८ रूपयांचा गैरवापर झाला असून, तडजोड रक्कम ७० हजार रूपये निश्चित करण्यात आली आहे. महिला पोलीस अंमलदार वर्षा पंडित अधिक तपास करीत आहेत.

### शेतकऱ्यांना मिळाला वहिवाटीचा रस्ता

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – मांजरसुंबा येथील शेतकऱ्यांचा वहिवाटी रस्त्याचा वाद अखेर महसूल विभागाच्या हस्तक्षेपाने संवादाच्या माध्यमातून निकाली निघाला आहे. महसूल सप्ताहानिमित्ताने तहसीलदार संजय शिंदे यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन रस्त्याचे मोजमाप करून हद्द निश्चित केली आणि प्रत्यक्ष रस्ता तयार करण्यास सुरुवात केली. या निर्णयामुळे २५० पेक्षा अधिक शेतकऱ्यांना या रस्त्याचा फायदा होणार असून अनेक विद्यार्थी जे ३ किलोमीटरचा फेरा मारून शाळेत जात होते, त्यांनाही आता सहज आणि जवळचा मार्ग उपलब्ध होणार आहे. गावातील सलोखा, समंजसपणा आणि महसूल प्रशासनाच्या सक्रिय सहभागातून झालेल्या या निर्णयाचे गावकऱ्यानी कौतुक केले. तहसीलदार संजय शिंदे यांनी उपस्थित ग्रामस्थांना संबोधित करताना म्हटले, मांजरसुंबा गावाने सकारात्मक उदाहरण उभे केले आहे. शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक शेतकऱ्याला शेतावर जाण्यासाठी रस्ता मिळणे हा मूलभूत हक्क आहे. प्रशासन केवळ माध्यम ठरते; पण संवाद, एकत्रित विचार व समंजसपणा यातूनच शाश्वत निकाल साधता येतो. यावेळी नायब तहसीलदार अभिजीत वांडेकर, रामकिसन नलवडे, अनिता जाधव, राजू वाघमारे, लहानू कदम, किरण कदम, चंद्रभान कदम, एकनाथ कदम, विजय वाघमारे, शिवाजी आढाव, रामदास पठारे, भीमराज कदम, सागर वाघमारे, प्रकाश कदम, गोरख श्रीधर आदीसह उपस्थित होते.

### भारत भारतीच्या अध्यक्षपदी रासने

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– नगरमध्ये विविध सामाजिक, भाषिक, राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक आणि सौहार्द यासाठी योगदान देणाऱ्या भारत भारती संस्थेच्या २०२५-२७ वर्षाच्या अध्यक्षपदी रमेश रासने यांची निवड करण्यात आली आहे. भारत भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष विनय पत्राळे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र प्रदेश बैठकीत रमेश रासने यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली. रा. स्व. संघाचे जिल्हा संघचालक वाल्मिक कुलकर्णी यांनी रमेश रासने यांच्या नावाची सूचना मांडली त्यास माजी अध्यक्ष के.के.शेट्टी यांनी अनुमोदन दिले. यावेळी भारत भारतीचे प्रदेश सचिव डॉ.धर्मेंद्र राजवद, प्रदेश प्रभारी अतुल शेवडे, प्रदेश उपाध्यक्ष कमलेश भंडारी व प्रदीप पेशकर आदींसह भारत भारतीचे सर्व सदस्य उपस्थित होते.भारत भारतीच्या उपाध्यक्षपदी चिराग शहा व संदीप कोद्रे, सेक्रेटरी चंद्रकांत पंडित, सह सेक्रेटरी सुनील बोरा व रितेश नय्यर, खजिनदार हिरालाल पटेल, सह खजिनदार अमित धोकरीया, प्रकल्प प्रमुख समीर बोरा, सतीश गवळी आदींची नियुक्ती या बैठकीत जाहीर करण्यात आल्या.

### भगवान श्री जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– बागडपट्टी येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिरात भगवान श्री जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. कार्यक्रमाची सुरुवात रिधिमा व गणेश लांडगे यांच्या हस्ते महाअभिषेकाने झाली. त्यानंतर कृष्णा बागडे यांनी जिव्हेश्वर ग्रंथाचे वाचन केले. पालखी पूजन सौ. मनीषा पाठक व संदीप पाठक यांनी केले, तर महाआरती आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पार पडली. या प्रसंगी आ. संग्राम जगताप, दीपक सुळ, धनंजय जाधव, गणेश कवडे, बाळासाहेब भुजबळ, संजय झिंजे, बाबासाहेब सानप, मुकुल गंधे, बाली बांगरे, काशिनाथ मोटे, हरिभाऊ डोळसे, सुरज जाधव, विक्रम पाठक, लक्ष्मीकांत तरोटे, गजेंद्र सोनवणे, विजय मानकर, संजय सागांवकर, जितेंद्र लांडगे, सचिन मडके, बाबासाहेब वैद्य, गणेश झिंजे, अभिजीत अष्टेकर, उत्सव समितीचे राकेश गवते, योगेश भागवत, चंद्रकांत मानकर, सुनिल पावले, प्रविण जुंदरे, सुरेश इंगळे, किशोर विंचुरकर, किरण डफळ, निरज चांगटे, प्रदिप दळवी, महेश कांबळे, योगेश पांढरपोटे, श्रीमती. छाया साळी, सौ.वनिता पाटेकर, सल्लागार कृष्णा बागडे, सोमनाथ खाडे, प्रताप मारवाडे उपस्थित होते.

# सिस्पे शेअर घोटाळ्याची जबाबदारी उद्घाटन करणाऱ्या लोकप्रतिनिधींनी घ्यावी

## डॉ. सुजय विखे पाटील : पद्मश्रींच्या जयंतीनिमित्त ज्येष्ठ नागरिकांना सन्मान

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– सिस्पे शेअर मार्केट ट्रेडिंग कंपनीचे उद्घाटन लोकप्रतिनिधीच्या हस्ते झाले होते. तसेच त्यांच्या कार्यकर्त्यांना गाड्यांचे वाटप करण्यात आले. या कंपनीने गोरगरिब शेतकऱ्यांकडून हजारो कोटी रुपये उकळवले आणि कंपनीचे प्रमुख फरार झाले. हा प्रकार म्हणजे दिवसाढवळ्या टाकलेला दरोडा असून, याची संपूर्ण जबाबदारी उद्घाटन करणाऱ्या लोकप्रतिनिधीने घ्यावी. लोकप्रतिनिधी जर अशा फसव्या कंपन्यांचे उद्घाटन करत असेल, तर जनतेला त्यावर विश्वास बसणारच. यामुळे अशा प्रकारात उद्घाटन करणाऱ्या संबंधीत लोकप्रतिनिधींनी आता कंपनीतील घोटाळ्याची जबाबदारी घ्यावी. मी खासदार असताना वेळेआधी प्रकल्प पूर्ण



केले. मात्र गेल्या तीन वर्षांत जिल्ह्यात एकही महत्त्वाचा केंद्र सरकारचा प्रकल्प आला नाही, असा आरोप त्यांनी केला.

नगरमध्ये पद्मश्रींच्या जयंतीनिमित्त ज्येष्ठ नागरिकांना सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. विखे बोलत होते. यावेळी त्यांनी महाराष्ट्र सरकारने या जयंतीला 'शेतकरी दिन' म्हणून घोषित केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. सहकाराच्या माध्यमातून शेतकरी आपल्या पायावर उभा रहावा, हेच पद्मश्रींचं स्वप्न होतं. आज आलेला प्रत्येक ज्येष्ठ नागरिक त्या स्वप्नपूर्तीचा साक्षीदार आहे, असे डॉ. विखे म्हणाले. केंद्र व राज्य सरकारच्या महायुती सरकारमधील योजना गोरगरीब आणि सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचं काम प्रामाणिकपणे करणारा प्रत्येक युवक भविष्यात मोठ्या पदावर पोहोचणारच आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना १२ हजार रुपयांचे साहित्य कोणतीही कोणाला टक्केवारी न देता मिळत आहे. फक्त मोदी, मुख्यमंत्री फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि विखे पाटील परिवारावर विश्वास ठेवल्याने ही मदत शक्य झाली, असे ते म्हणाले.

### पुढील महिन्यांत साकळाईचे भूमीपूजन

- १९०० कोटी रुपयांच्या साकळाई प्रकल्पाचे पुढील महिन्यांत भूमीपूजन होणार आहे. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकारातून साकार होत असून, आ. शिवाजीराव कर्डिले आणि पाचपुते यांच्या मार्गदर्शनाखाली जलदगतीने पूर्णत्वास जात आहे. या योजनेमुळे नगरच्या ग्रामीण भागातील जिरायती शेतकऱ्यांना पाणी पुरवठ्याचा मोठा लाभ होणार आहे.

### वंदे भारतचे श्रेय मोदी यांनाच

- वंदे भारत एक्सप्रेस संदर्भात देखील त्यांनी भाष्य केले. ते म्हणाले, या बाबतीत सध्या काहीजण श्रेय लाटण्याचा प्रयत्न करत आहेत. पण ही काही श्रेयवादाची लढाई नाही. काम खरोखर मार्गी कुणी लावले आहे, हे आधी पाहणे गरजेचे आहे. ज्यांना श्रेय घ्यायचे आहे त्यांनी घ्यावे, पण ते घेताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानावे.

# ग्रामपंचायतींमध्ये स्वातंत्र्यदिनी स्वच्छता, देशभक्तीचा संगम

## 'स्वतंत्रता का उत्सव, स्वच्छता के संग' मोहिम राबविणार

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– सांस्कृतिक मंत्रालय नवी दिल्ली यांच्या माध्यमातून देशभरात हर घर तिरंगा मोहिम राबविण्यात येत आहे. ही मोहिम आता राष्ट्रीय अभिमान आणि लोकांच्या सहभागाचा उत्सव बनली आहे. या वर्षीच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिना निमित्त, हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता ही मोहिम स्वतंत्रता का उत्सव, स्वच्छता के संग या टॅग लाईन अंतर्गत पेयजल व स्वच्छता विभाग, जलशक्ती मंत्रालय व राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने ८ ते १५ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात येणार असल्याची माहिती आनंद भंडारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली.

हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता ही मोहिमेची संकल्पना लोकसहभागातून उत्सव व नागरी एकतेच्या भावनेवर आधारित आहे. ज्यामध्ये स्वातंत्र्याचा सार स्वच्छता व सुजलता या संकल्पनेशी जोडली गेली आहे. पंतप्रधानांची संकल्पना बळकट करण्यासाठी ग्रामीण भागात, स्वच्छ पाणी पुरवठा, शाश्वत स्वच्छता व आरोग्य सुनिश्चित करण्यासाठी थरडक (पाणी, स्वच्छता आणि आरोग्य) या मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेचा जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर ८ ऑगस्ट रोजी शुभारंभ करण्यात येणार असून स्वच्छ सुजल गाव प्रतिज्ञा नागरीक व शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातुन घेण्यात येणार आहे. ९ ते ११ ऑगस्ट या कालावधीत सार्वजनिक स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये सार्वजनिक ठिकाणे, जलकुंभ, पाणी आणि स्वच्छता सुविधांची स्वच्छता करणे. गावातील विद्यार्थी, युवक यांची स्वच्छता रॅली, वैयक्तिक घरगुती स्तरावर रांगोळी काढणे व स्वच्छता घटकांना रंगकाम करणे. नाल्यांची स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन, पाण्याची गळती शोधणे व थांबवणे. सार्वजनिक शौचालय, घनकचरा व्यवस्थापन केंद्र, प्लास्टीक व्यवस्थापन केंद्र परिसरासह इतर सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहिम राबवणे. प्लास्टिक कचरा संकलन मोहीम राबवून त्याच्या व्यवस्थापनाशी संबंधित तपासणी करणे. सार्वजनिक स्वच्छताः आझादी का श्रमदान सार्वजनिक ठिकाणासह रस्त्यांवर साफसफाई करणे आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या मोहिमेत जिल्ह्यातील ग्रामपंचायती व जिल्हावासीयांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन राजेंद्र देसले प्रकल्प संचालक जलजीवन यांनी केले आहे.

# बँक कर्मचाऱ्याकडून ४.७२ लाखांचा अपहार

## वसूल केलेली रक्कम बँकेत जमा केलीच नाही

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – कोटक महिंद्रा बँक, नागापूर शाखेतील कर्मचाऱ्याने कर्जदारांकडून वसूल केलेली रक्कम बँकेत जमा न करता स्वतःकडे ठेवून ४ लाख ७२ हजार ६० रूपयांचा अपहार केल्याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फसवणूक, विश्वासघात कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संजय रघुनाथ भंडारे (वय ४५ रा. सारसनगर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. सुनील दिलीप सोनटक्के (रा. चांदगाव रस्ता, सोनटक्के वस्ती, ता. पाथर्डी) असे गुन्हा दाखल झालेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. सदरची घटना ९ नोव्हेंबर २०२३ पासून घडली असून गुरूवारी (७ ऑगस्ट) एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. संजय भंडारे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, संशयित आरोपी सुनील सोनटक्के हा कोटक महिंद्रा बँकेच्या नागापूर शाखेत कर्मचारी म्हणून कार्यरत होता. ९ नोव्हेंबर २०२३ पासून त्याने बँकेच्या वतीने विविध कर्जदारांकडून एकूण ४ लाख ७२ हजार ६० रूपये इतकी रक्कम वसूल केली होती. मात्र, ही रक्कम नियमानुसार बँकेत जमा न करता स्वतःच्या फायद्यासाठी वापरली. सदर प्रकार उघडकीस आल्यानंतर ७ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी भंडारे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# गणेशोत्सवात मंडळांना एका क्लिकवर ऑनलाईन परवानग्या

## मनपातर्फे संकेतस्थळावर सुविधा; सोमवारपासून सुरुवात

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – गणेशोत्सवात व इतर सण - उत्सव काळात मंडप उभारणी, स्वागत कमानी, रनिंग मंडपसाठी सर्व परवानग्या एकाच क्लिकवर मिळणार आहेत. महानगरपालिका, महावितरण व शहर वाहतूक शाखा यांच्यातर्फे संयुक्तपणे एक खिडकी योजनेचे कामकाज ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. त्यासाठी www.amcfest.in या संकेतस्थळावर गणेश मंडळांना विनाशुल्क परवानगीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सोमवारपासून परवानगीची प्रक्रिया सुरू होणार असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार नियमांचे पालन करून उत्सव काळात महानगरपालिकेकडून परवानग्या दिल्या जातात. त्यासाठी अतिक्रमण निर्मूलन विभागात एक खिडकी योजना राबवली जात होती. मागील वर्षी पासून स्वतंत्र संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे. त्यावरून परवानग्या दिल्या जात आहेत. याही वर्षी संकेतस्थळावरून परवानग्या दिल्या जाणार आहेत. मात्र, जागामालक अथवा सोसायटीचे ना हरकत प्रमाणपत्र, तसेच स्थानिक पोलीस ठाण्याची परवानगी गणेश मंडळांना त्यांच्या स्तरावर घ्यावी लागणार आहे. उत्सव काळात मंडपाची उंची ४० फुटापेक्षा जास्त नसावी. ४० फुटापेक्षा जास्त उंचीचा मंडप उभारणार असल्यास सुरक्षिततेसाठी अधिकृत स्थापत्य अभियंत्याकडून स्टॅबेलिटी सर्टिफिकेट जोडावे. मंडप व स्वागत कमानी उभारताना आपत्कालीन गाड्या जाण्यासाठी रस्ते मोकळे ठेवावेत. गणेशोत्सव संपल्यानंतर तीन दिवसाच्या आत मंडप, रनिंग कमानी, देखावे, बांधकाम हटवण्यात यावे. मुख्य विसर्जन मिरवणूक मार्गावर असलेल्या मंडळांनी मिरवणूक सुरू होण्यापूर्वी तेथील मंडप, कमानी काढून घ्याव्यात, मंडप उभारणीसाठी रस्त्यावर कुठेही खड्डे घेऊ नयेत, अन्यथा नियमानुसार कारवाई केली जाईल, असेही डांगे यांनी स्पष्ट केले आहे.

# नामांकित कंपनीच्या बनावट चप्पलची विक्री

## दुकानदाराविरूध्द गुन्हा दाखल

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – एका नामांकित चप्पल कंपनीचे नाव वापरून बनावट चप्पल विक्री करणाऱ्या दुकानावर कारवाई करण्यात आली आहे. सहा हजार रूपये किमतीचे १२० जोड्या बनावट चप्पलचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हरचंद्रम ओखाराम सुंदेशा (वय ३९, मूळ रा. धानसा, जि. जालोर, राजस्थान, सध्या रा. माळीवाडा, अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या दुकानदाराचे नाव आहे.

संबंधीत कंपनीने कॉपीराईटचे अधिकार दिलेल्या कोल्हापूर येथील कंपनीचे तपासणी अधिकारी मयुर राजेश धुमाळ (वय ३६ रा. कोल्हापूर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, गुरूवारी (७ ऑगस्ट) सकाळी ९ वाजता फिर्यादी व त्यांचे सहकारी सुहास जाधव यांनी अहिल्यानगर शहरात कंपनीच्या बनावट चप्पल विक्री करणाऱ्यांचा शोध घेतला. मिळालेल्या माहितीनुसार, कोतवाली पोलिसांच्या मदतीने जय भवानी ट्रेडर्स, वसंत टॉकीज शेजारी, अमन पाटील रस्ता, माळीवाडा या ठिकाणी छापा टाकण्यात आला. छाप्यात दुकानधारक सुंदेशा याच्याकडे नामांकित कंपनीचे नाव लिहिलेल्या १२० जोड्या चप्पल आढळल्या. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# डॉन बॉस्को परिसरात अल्पवयीन गुन्हेगारी टोळ्यांचा त्रास

## कठोर कारवाईची मागणी; तोफखाना पोलिसांना निवेदन

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – डॉन बॉस्को परिसर व नागापूर भागात अल्पवयीन गुन्हेगारी प्रवृत्तीच्या मुलांकडून नागरिक, महिला व मुलींना छेडछाड आणि त्रास देण्याच्या घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या टोळ्या रात्री-अपरात्री गोंधळ घालत, दारू-पदार्थ व गांजाचे सेवन करत तसेच हत्यारे बाळगत असल्याचे नागरिकांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर डॉन बॉस्को परिसरातील महिलांनी तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्याकडे निवेदन देऊन कठोर कारवाईची मागणी केली.

महिलांनी निवेदनात नमूद केले की, महापालिकेने ख्रिस्ती बांधवांसाठी बांधलेले समाज मंदिर या टोळक्यांचे अड्डे झाले आहेत. शाळा व क्लासला जाणाऱ्या मुलींची छेडछाड केली जात असून, मुलींना घराबाहेर सोडणेही धोक्याचे झाले आहे. त्यामुळे पोलिसांनी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, डॉ. सागर बोरूडे यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी बारस्कर म्हणाले, अल्पवयीन असल्याचा फायदा घेत काही मुले दहशत निर्माण करत आहेत. त्यांच्या पालकांनी शिस्त लावणे गरजेचे आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करून परिसरात सुरक्षितता वाढवावी.

यावेळी निरीक्षक कोकरे म्हणाले, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या मुलांना कायद्याच्या जोरावर नीट करू. महिलांनी घाबरू नये, पोलीस तुमच्यासोबत आहेत. मात्र तक्रार करणे आवश्यक आहे. अल्पवयीन मुलांवर कारवाई करताना काही कायदेशीर अडथळे येतात, तरी पालकांनी आपल्या मुलांना गुन्हेगारी प्रवृत्तीच्या साथीपासून दूर ठेवावे. पोलिसांची गस्त सुरू आहे आणि नागरिकांनीही सतत पोलिसांच्या संपर्कात राहावे.

# उधारी १८७ कोटी आणि आले अवघे २४६ कोटी

## जिल्हा नियोजनमधून नवीन कामांसाठी उपलब्ध झाले नव्याने ५९ कोटी

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– गेल्या पाच महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर जिल्हा नियोजन समितीला ३० टक्क्यांनी २४६ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. या निधीतून मागील कामांची देयके अदा केली जाणार आहेत आणि त्यानंतर नवीन कामांसाठी तरतूद होण्याची शक्यता आहे. दरम्यान, नियोजन समितीचे १८७ कोटी रुपयांचे मागील वर्षीची जुनी देणी (उधारी) असून ती वजा केली असता यंदाच्या नियोजन समितीच्या मंजूर निधीपैकी प्रशासनाच्या हाती अवघे ५९ कोटी राहणार आहे. यामुळे नियोजनच्या निधीचे नियोजन कसे करावे, असा प्रश्न जिल्हा प्रशासनासमोर राहणार आहे.

मागील आर्थिक वर्षात म्हणजे २०२४-२५ मध्ये जिल्हा नियोजन समितीने प्रस्तावित केलेल्या कामांपैकी काही कामे पूर्ण झाली आहेत. या कामांवरील सुमारे १८७ कोटी रुपयांची देयके देणे बाकी आहे. त्यामुळे ज्या यंत्रणांनी १०० टक्के कामे पूर्ण केली आहेत, त्यांना मिळालेल्या रकमेतून देयके दिली जातील. त्यानंतर उरलेला निधी नवीन कामांसाठी वितरित केला जाईल. सध्या जिल्हा नियोजन समिती विविध यंत्रणांकडून प्रस्ताव मागत आहे आणि प्राप्त प्रस्तावांनुसार निधी वाटपाचे नियोजन केले जाणार आहे.दरम्यान, आधीची विविध विभागांच्या विकास कामांची देयके मागील चार ते सहा महिन्यांपासून थकली होती. त्यामध्ये जिल्हा नियोजन समितीचा निधी हा मुख्य होता. त्यामुळे निधी न मिळाल्यास कामे कशी पार पाडायची, हा प्रश्न होता.

चालू आर्थिक वर्षे २०२५-२६ साठी ८२० कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्यात आला होता. या आराखड्याला राज्य नियोजन समितीकडून मान्यता मिळाली होती. दरवर्षी निधी टप्प्याटप्प्याने वितरित केला जातो. त्यामुळे यावर्षीही पहिला टप्पा लवकर मिळेल अशी अपेक्षा होती, पण चार महिन्यांच्या प्रतीक्षेनंतरच निधी मिळाला. एप्रिल महिन्यात अहिल्यानगर जिल्ह्याचा विकास आराखडा तयार करण्यात आला होता. ८२० कोटी रुपयांच्या आराखड्यात विविध यंत्रणांसाठी कामांची तरतूद करण्यात आली आहे. शासनाने जिल्हा नियोजन समितीला ३० टक्के निधी वितरण केले आहे. मात्र, मागील आर्थिक वर्षात पूर्ण झालेल्या कामांची देयके आधी द्यावी लागणार आहेत. त्यानंतर उरलेला निधी नव्या कामांसाठी वापरावा लागणार आहे.

### अशी आहे तरतूद

- कृषी व संलग्न सेवा ३१ कोटी ६७, ग्रामीण विकास १५ कोटी, पाटबंधारे व पूरनियंत्रण ९ कोटी ८५ लाख, ऊर्जा २८ कोटी ५० लाख, उद्योग व खाण १ कोटी २४ लाख, परिवहन ३२ कोटी ७० लाख, सामान्य आर्थिक सेवा ३१ कोटी ५६ लाख, सामाजिक सेवा ६६ कोटी ४९ लाख, सामान्य सेवा १२ कोटी ६४ लाख, इतर जिल्हा योजना ४ कोटी ८० लाख, नाविन्यपूर्ण योजना व मूल्यामापन ११ कोटी ५१ लाख असा निधी मंजूर आहे.

# महिलेला मारहाण; जीवे मारण्याची धमकी; दोघांविरोधात गुन्हा दाखल

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – घोसपुरी (ता. अहिल्यानगर) येथे झाडे लागवड करण्यावरून झालेल्या वादातून एका महिलेला जातीवाचक शिवीगाळ करत लाथाबुक्कीने मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात दोघांविरोधात अ‍ॅट्रॉसिटीसह अन्य कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात कविता स्वामी चव्हाण (वय २५, रा. घोसपुरी) यांनी फिर्याद दिली आहे. विठ्ठल हंडोरे (पूर्ण नाव माहिती नाही), संतोष भगवंत खोबरे (दोघे रा. घोसपुरी) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. फिर्यादी कविता या २ ऑगस्ट रोजी दुपारी सुमारास आपल्या घरी असताना, घराच्या पाठीमागील स्मशानभूमीजवळ विठ्ठल हंडोरे व संतोष खोबरे हे झाडे लावण्यासाठी जेसीबी मशीन घेऊन आले. फिर्यादी यांनी त्यांना कामाबाबत विचारणा केली असता संशयित आरोपींनी येथे झाडे लावायची आहेत, तुमचे घरसुध्दा येथे काढावे लागेल असे सांगितले. त्यावर फिर्यादींनी विरोध व्यक्त केला असता संशयित आरोपींनी जातीवाचक शिवीगाळ करून लाथाबुक्कीने मारहाण केली आणि जीवेठार मारण्याची धमकी दिली.

मारहाणीमध्ये जखमी झालेल्या फिर्यादींना उपचारासाठी तत्काळ जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. ५ ऑगस्ट रोजी त्यांना डिस्चार्ज मिळाला. त्यानंतर ७ ऑगस्ट रोजी त्यांनी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात हजेरी लावून फिर्याद दिली. अधिक तपास अहिल्यानगर ग्रामीणचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती करीत आहेत.